Vol 4 Issue 12 Jan 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-4 | Issue-12 | Jan-2015
Available online at www.isrj.org

# सहकार : स्वरूप, व्याप्ती आणि आवश्यकता -एक दृष्टीक्षेप

साळवे जगन्नाथ मोतीराम

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मु.सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर.

***सारांश :***-सहकार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. भारतात हजारो वर्षापुर्वी होऊन गेलेल्या अनेक सतांनी आपल्या धार्मिक ग्रंथातून दुर्वलास मदत करणे, असहाय्यास सहाय्य करणे, आपल्या आनंदात तसेच दु:खात इतरांना सामावुन घेणे या वावी सहकाराच्या माध्यमातुन व्यक्त केलेल्या आहेत. मानवी समाजातील सामाजिक व आर्थिक संस्थांची आधारभुत संकल्पना देखील सहकार या तत्वांवर आधारलेली आहे. मानवाचा इतिहास शोधत असताना तेथेही सहकाराची वीजे सापडतात. सहकार म्हणजेच एकत्र काम करणे होय. एकत्र राहणे होय. तसेच वेळप्रसंगी एकमेकांना मदत करणे होय.

## *प्रस्तावना :*

सहकार ही नैसर्गिक प्रवृती असून ती सहजपणे आपल्या वागण्या-बोलण्यातुन व्यक्त होत असते. रोजच्या व्यवहारातुन ती सहजपणे दिसुन येते. उदा. आपणास कोणी पुस्तक मागितले असेल. एखादया मानसाचा पत्ता विचारला असेल तर त्या सर्व गोष्टी तुम्ही त्या व्यक्तीला सांगितल्या किंवा दिल्या तर तो सहकार होय आणि प्रत्येक व्यक्ती आपले आपले जीवन जगत असताना त्याला सहकाराची आवश्यकता नेहमी भासत असते. आज देखील जगामध्ये सहकाराचे अस्तित्वच नाही असा एकही देश शोधून सापडणार नाही. याउलट अलिकडील काळात सहकाराचे महत्व दिवसेंदिवस वाढत असून सहकाराने फार मोठे क्षेत्र व्यापलेले दिसून येते. उदा. कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्र, सेवा क्षेत्र इत्यादी. सहकाराचे स्थान केवळ मानवी जीवनातच महत्वाचे आहे असे नाही, तर पशु, पक्षी, किटक यासारख्या प्राण्यांमध्ये देखील सहकाराची प्रवृती आढळून येते.

थोडक्यात आपली ध्येय साध्य करण्यासाठी एकत्र येऊन एकमेकांना सहाय्य करून आपला विकास करणे म्हणजे सहकार होय. खरे तर आपण सहकारावरच अधिक प्रमाणात जीवन जगत असतो असे म्हणता येईल.

## सहकाराचा अर्थ:

सहकार म्हणजे एकत्रित काम करणे होय. मानवी समाजाच्या निर्मितीत एवढेच सहकाराचे तत्व जुने आहे. Co-operation हा शब्द लॅटिन भाषेतील Co-operation या शब्दापासुन निर्माण झाला आहे. या लॅटिन शब्दाचा अर्थ एकत्र काम करणे असा आहे. जेव्हा सहकार या शब्दाचा वापर सामाजिक आणि शास्त्रीय दृष्टीकोनातून केला जातो. तेव्हा त्याचा अर्थ समान आर्थिक गरजा भागविण्याच्या वावतीत मध्यस्थांकडून होणारे आर्थिक शोषण नाहीसे करण्यासाठी लोकांनी स्वेच्छेने निर्माण केलेली व्यवस्था असा होतो. सहकार ही मनुष्याची सामाजिक प्रवृती आहे. समाजाच्या अर्थिक कल्याणसाठी या प्रवृतीचा कसा उपयोग करून घ्यावयाचा यावरून सहकाराची व्याप्ती व स्वरूप ठरते. प्रत्येक देशातील निरनिराळया सामाजिक, राजकिय व आर्थिक परिस्थितीतून सहकारी चळवळीचा उगम झाला. काही देशातील शासनाने उत्तेजन दिले.

भारतासारख्या काही देशातील शासनाने सहकारास नियोजनाचे साधन मानले आहे. सहकारात परस्पर सहाय्य आणि एकमेकांना मदत करणे अपेक्षीत असते. सहकार ही एका उपजत नैसर्गिक आणि सहज प्रवृती आहे. राजेशाही, लोकशाही व हूकुमशाही इत्यादी सर्व राजकीय प्रणालीत सहकाराची प्रेरणा महत्वाची ठरली आहे. एवढेच नाही तर समाजवाद आणि साम्यवाद या विचार प्रणाली सुध्दा सहकाराविना केवळ पोकळ ठरतात. त्यामुळे विना सहकार नाही उध्दार असे प्रसिध्द घोषवाक्य वापरले जाते.

मानवी जीवन अस्तित्वासाठी कटु स्पर्धेपेक्षा सहकार अधिक प्रभावशाली घटक असतो. अशा प्रकारे सहकार म्हणजे परस्पर सहकार्य होय. त्यामुळे एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ असे म्हटले जाते.

सहकाराची व्याख्या :

१)प्रा . कॅनव्हर्ट यांच्या मते : व्यक्तीने स्वेच्छेने एकत्र येऊन आपल्या आर्थिक हितसंबंधाच्या उन्नतीसाठी समानतेच्या तत्वावर निर्माण केलेली संघटना म्हणजे सहकार होय .
२) सी . आर . फे : दुर्बलांनी निर्माण केलेली व नि:स्वार्थी भूमिकेतून संयुक्त व्यवहारासाठी त्यांनी स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी संस्था होय . या सस्थेचा कारभार अशा अटीवर चालविण्यात येतो की ज्या प्रमाणात सभासद करतात त्याच प्रमाणात संस्थेतील लाभात सहभाग उपलब्ध होतो .
३)प्रो . लॅवर्ट (१९६३) : स्वत:च्या उपयोगासाठी व्यक्तींच्या समुहाने निर्माण केलेली आणि नियंत्रित केलेली लोकशाही नियमानुसार चालविलेली सभासदांच्या आणि एकंदर समाजाच्या सेवेसाठी प्रयत्न करणारी व्यवहार संस्था म्हणजे सहकारी संस्था होय .
४)भारतातील सहकारी कायदा १९१२ प्रमाणे सहकारी संस्थांची व्याख्या : "सहकार तत्वांनुसार आपल्या सभासदांना आर्थिक हितसंबंधी कार्य करणारी संस्था म्हणजे सहकारी संस्था होय ."

सहकाराचे स्वरूप :

सहकाराच्या व्याख्यांवरून सहकाराचे विविधांगी स्वरूप स्पष्ट करता येईल, नेमके सहकाराचे स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होईल .

१) **संघटनात्मक स्वरूप :** व्यापार उद्योग करण्यासाठी एकल व्यापारी संस्था, भागीदारी संस्था, भांडवली कंपनी, सहकारी संस्था व सार्वजनिक उपक्रम असे पाच संघटन प्रकार आहेत . तेव्हा व्यापार, उद्योग, सेवा उद्योग करण्यासाठी सहकारी संस्था स्थापन केल्या जातात . त्यामध्ये पतपुरवठा सहकारी संस्था, सहकारी बँका, ग्राहक सहकारी संस्था, खरेदी-विक्री सहकारी संघ, सहकारी मजूर संस्था, दुग्धव्यवसाय सहकारी संस्था, कृषी विपणन सहकारी संस्था, पीक संरक्षण सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, पाणी पुरवठा सहकारी संस्था, बलुतेदार सहकारी संस्था आदी संघटनात्मक प्रकारांमध्ये सहकाराचे स्वरूप आढळते . सहकाराचे हे संघटनात्मक स्वरूप व्यक्तीचे संघटन अशा प्रकारे सुध्दा दिसून येते . समान उद्दिष्ट व समान गरजा यांच्या पूर्त तेसाठी स्वेच्छेने एकत्रित येऊन लोकशाही पध्दतीने सहकारी संस्था चालविल्या जातात . या संघटनात्मक स्वरूपावरून सहकाराची ओळख म्हणून हे स्वरूप सर्वात महत्वाचे आहे .

२) **आर्थिक स्वरूप :** सहकार हे अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचे अंग आहे . लोकांच्या आर्थिक विकासाचे ते एक माध्यम म्हणून ओळखले जाते . सहकाराचे आर्थिक स्वरूप अ)एक अर्थपध्दती ब)एक क्षेत्र क)एक चळवळ असे तिहेरी आढळते . ज्याप्रमाणे भांडवलशाही, साम्यवाद व समाज या अर्थपध्दती आहेत . त्याप्रमाणे सहकार ही सुध्दा एक अर्थपध्दती आहे . देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये खाजगीक्षेत्र, सार्वजनिक क्षेत्र व मिश्र क्षेत्र अशी क्षेत्रे आढळतात . तसेच सहकार क्षेत्र हे चौथे महत्वाचे क्षेत्र होय . भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये तर सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे . भारतातील साखर उद्योग हा सहकारी क्षेत्राच्या ताब्यात आहे . भारताच्या ग्रामीण भागातील कर्जपुरवठा सुध्दा सहकारी क्षेत्राच्या हातात आहे . अनेक अन्य व्यवसाय उद्योग सहकारी क्षेत्रामध्ये आहेत . यावरून सहकारचे स्वरूप स्पष्ट होते . भारतामध्ये तर सहकार ही एक आर्थिक चळवळ बनली आहे . ग्रामीण भागाच्या सर्वा ंगिण विकासासाठी सहकाराची चळवळ राबविली जात आहे .

३) **शैक्षणिक स्वरूप :** सहकाराला आज शैक्षणिक प्रसाराचे साधन समजले जाते . विशेषत: ग्रामीण भागातील शेतकरी, मजूर, आदिवासी लहान कारागीर, खेडूत, मागासवर्गीय, दुर्बल घटक, महिला या सर्वांच्या दृष्टीने सहकार हे शैक्षणिक प्रसाराचे साधन आहे . सहकारी संस्थांमुळे शिक्षणाचे व साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे . सहकाराच्या विस्तारामुळे प्रौढ शिक्षणालासुध्दा चालना मिळाली आहे . दुर्गम, डोंगराळ, अदिवासी, दुरच्या भागात जिथे सहकारी संस्था पोहचल्या आहेत . स्थापना झाल्या आहेत . तिथे शिक्षणाचा प्रसार झाला आहे . साक्षर होणे, शिक्षण घेणे ही महत्वाची जाणीव निर्माण करण्याचे श्रेय सहकारी चळवळीला दिले जाते . सहकाराला शैक्षणिक स्वरूप आहे .

४) **सामाजिक स्वरूप :** समाजाच्या उन्नतीचे माध्यम म्हणून सहकाराचे हे सामाजिक स्वरूप लक्षात घेतले पाहिजे वास्तविक काही सहकारी तज्ञांच्या मते, सहकार ही आर्थिक चळवळ नसून ती एक सामाजिक चळवळ आहे . कारण सहकार हे मुळात सामाजिक गरजेतून उदयास आले आहे . म्हणून समाजाच्या प्रबोधनाने व विकासाचे कार्य सहकारामुळे गतिमान झाले आहे . समाजामध्ये धर्म, जात, पंथ, वर्ग, लिंग हे सर्व भेद बाजूला सारून सर्व सभासदांना समपातळीवर वागणूक दिली जाते . त्यामुळे सामाजिक विषमता व स्पृश्यास्पृश्यता कमी होण्यास मदत झाली आहे . लोकशाही कारभारामुळे सर्वांना व्यवस्थापनात सहभागी होण्याची समान संधी प्राप्त होते . समाजातील दुर्बल घटकांना सहकारामुळे संरक्षण मिळले आहे . समाजातील सर्व भेद विसरून लोक एकत्र आल्याने समाजात एकसंघता व सामंजस्य निर्माण झाले आहे . सामाजिक सलोखा वाढला आहे . म्हणून सहकार ही समाजाची एक जीवनपध्दती बनली असल्याचे दिसून येत .

**सहकाराची व्याप्ती :** सहकाराची व्याख्या व स्वरूप यावरून सहकाराची व्याप्ती स्पष्ट होते . पण सहकाराची व्याप्ती समजून घेण्यासाठी तो कोण्त्या क्षेत्रात पसरला आहे . हे पहाणे उचित होईल . वास्तविक समाज्याच्या सामाजिक -आर्थिक क्षेत्रातील प्रत्येक अंग व्यापाले आहे . भारतातील महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये तर सहकार कुठे नाही? हा प्रश्न पडतो म्हणून सहकाराची व्याप्ती पुढील प्रमाणे सांगता येईल .

१) **कृषी क्षेत्र:** सहकाराचा सर्वात जास्त विस्तार कृषी क्षेत्रात झाला आहे. भारतात सुध्दा सहकाराने कृषी क्षेत्र सर्वात जास्त व्यापले आहे. शेतीसाठी पीक कर्ज, मध्यम व दीर्घ मुदतीचे कर्ज, बी-बियाणे, खते, कीटकनाशके, पाणीपुरवठा, शेतमाल, वहातुक आदींची सुविधा पुरविण्यासाठी विभिन्न प्रकारच्या सहकारी संस्था स्थापण झाल्या आहेत. कृषी क्षेत्राच्या विकास पतपुरवठयापासून पीकसंरक्षणापर्यंत विविध सेवा सहकारी संस्थामार्फत उपलब्ध होतात. म्हणून भारतात तरी कृषी क्षेत्र विकासासाठी सहकार वरदान ठरले आहे.

२) **उत्पादक- प्रक्रिया क्षेत्र** : कृषी मालावर आधारीत उत्पादन व प्रकिया करण्यास अनेक संस्था स्थापन झालेल्या आहेत. साखर उत्पादन तर भारतातील सहकारी क्षेत्र जगात प्रसिध्द आहे. सुतगिरणी, तेलगिरण्या, दूध प्रकिया संस्था, विणकर संस्था, खत कारखाना, कीटकनाशके निर्मिती, शेती उपयोगी साधने, सहकारी शेती, भातगिरण्या आदी बाबतीत असंख्य सहकारी संस्था स्थापन झालेल्या दिसून येतात.

३) **लघुउद्योग क्षेत्र** :ग्रामीण उद्योग व लघुउद्योग क्षेत्रातसुध्दा सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. कर्जपुरवठा करण्याबाबत सुध्दा सहकारी बँका व नागरी सहकारी बँका लघुउद्योगांना सवलत देतात.

४)**बँकिंग क्षेत्र** : ग्रामीण भागात जिल्हा सहकारी बँकामार्फत सहकार बँकिंग क्षेत्रात कार्य करताना दिसते. विशेषत: बँकिंग क्षेत्र सहकाराने काबीज केलेले आहे. मोठमोठया शहरामध्ये नागरी सहकारी बँका व्यापक प्रमाणात कार्य करीत आहेत. तसेच ग्रामीण भागामध्ये शेतीसाठी कर्जपुरवठा करणा-या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था कार्यरत आहेत.

५)**नागरी क्षेत्र** :सहकाराने काही बाबतीत नागरी क्षेत्र बरेच व्यापले आहे. विशेषत: गृहनिर्माण, सदनिका, मालक सहकारी संस्था, पगारदारांच्या पतसंस्था, नागरी पतसंस्था इ. प्रकारच्या सहकारी संस्था स्थापण झालेल्या आहेत.

५) **ग्राहक क्षेत्र** : ग्राहकांना गृहपयोगी व जिवनावश्यक वस्तु पुरवण्यासाठी ग्राहक सहकारी भंडारे व संस्था कार्य करताना दिसून येतात. शेती अवजारे, पेट्रोल, डिझेल इत्यादी विकण्यासाठी सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत.

६) **सेवा क्षेत्र:** विविध प्रकारच्या सेवा देण्यासाठीसुध्दा सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. त्यामध्ये पीक संरक्षण, पाणीपुरवठा, वाहतूक, कृषीमाल साठवणूक, खरेदी-विक्री, बँकिंग इ. क्षेत्रातील सहकारी संस्थांचा समावेश होता.

७) **सहकारी शिक्षण** : सहकारी शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर व राज्यपातळीवर संस्था/प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. केंद्र सरकारने पुणे येणे येथे वैकुंठ मेहता सहकारी व्यवस्थापन संस्था स्थापन केली आहे. तर महाराष्ट्रातील सहकाराचे प्रशिक्षण देणारी दोन महाविद्यालये व तेरा प्रशिक्षण केंद्रे आहेत. सहकार खात्यामार्फत ती चालविली जातात.

**सहकाराची आवश्यकता:** प्रामुख्याने लोकसंख्येच्याबाबतीत भारताचा जगाच्या बाबतीत दुसरा क्रमांक लागतो. भारतीय अर्थव्यवस्था ही विकसनशील असल्यामुळे या देशातील जनतेच्या सर्वांगिण विकसासाठी सहकारासारखे माध्यम निश्चितच उपयोगी आहे. म्हणूनच सहकाराची आवश्यकता पुढील मुद्दयावरून लक्षात येईल.

१) **दुर्बल घटकांचे शोषण थांबविणे** : पुर्वी समाजातील अनेक दुर्बल लोकांना आपल्या गरजांच्या पुर्ततेसाठी पैशाची गरज भासते. त्यासाठी ते सावकाराकडे जात. सावकार त्यांना प्रचंड व्याज दराने कर्ज देत असत. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती आणखीण हालाकीची होत असे. परंतू सहकारी संस्था आपल्या सभासदांना कमी व्याजदराने कर्ज पुरवठा करीत असल्याने दुर्बल लोकांचे शोषण थांबण्यास मदत झाली आहे.

२) **कृषी क्षेत्रच्या समृध्दीकरता** : भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे या कृषीक्षेत्राचा विकास करण्यासाठी केवळ राष्ट्रीयकृत व व्यापारी बँका पुरेशा नाहीत. तर सहकारी पतपुरवठयाची सुध्दा नितांत आवश्यकता आहे.

३) **लघुद्योग क्षेत्रचा विकस** : देशाचा ग्रामीण भागातून अनेक लघुद्योग, ग्रामीण उद्योग, शेतीपुरक उद्योग आणि शेतीवर आधरित उद्योग स्थापन झालेले असतात. अशा उद्योगांना सातत्याने भांडवलाची आवश्यकता असते. ही गरज सहकारी संस्था व बँका पुर्ण करतात. म्हणून उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी सहकाराची आवश्यकता आहे.

४)**रोजगार निर्मिती** : देशातील लाखो सहकारी संस्थाच्या माध्यमातून रोजगार निर्मीण झाला आहे आणि पुढे ही रोजगार निर्माण होण्याची संधी जास्त आहे. म्हणून सहकारी क्षेत्राची गरज आहे.

५) **प्रादेशिक समतोल** : आपल्या देशातील शहरी भागाचा विकास झालेला आहे. त्यामानाने ग्रामीण भागाचा विकास झालेला नाही. सहकारी संस्था ग्रामीण व शहरी भागात स्थापन झाल्यामुळे ग्रामीण भागातील साधन सामग्रीचा परेपुर उपयोग करून ग्रामीण व शहरी ही दरी कमी होऊन प्रादेशिक समतोल

होण्यास सहकारामुळे मदत झाली आहे .

६) **सभासदांचे राहणीमान उंचावणे:** सहकारी संस्था आपल्या सभासदांना अल्पदराने कर्ज, त्यांच्या ठेवीवर व्याज तसेच त्यांनी गुंतविलेल्या भांडवलावर लाभांश देते . त्यामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होऊन त्यांची राहणीमानाची पातळी उंचावते .

अशा प्रकारे वरील मुद्दयांवरून असे लक्षात येते की, आपल्या देशात सहकाराची नितांत आवश्यकता आहे .

संदर्भ :-

१) डॉ . गो . स कामत- सहकार तत्व व्यवहार आणि व्यवस्थापन, श्री विद्या प्रकाशन,पुणे द्वितीय आवृत्ती ऑगस्ट १९७९ .
२) डॉ . के . आर दातीर- भारतातील बॅकव्यवसाय आणि सहकार, प्रगती प्रकाशन, पुणे प्रथम आवृती .
३)डॉ . वि . वि घाणेकर-सहका चळवळ १00वर्षाचे अवलोकन व नवी अव्हाने,इन्स्टीटयुट ऑफ रूरल डेव्हलपमेंट ॲन्ड एज्युकेशन पुणे .
४) C.R Fay – Co-operation At Home and abroad,P.S King ans san Ltd.



**सालवे जगन्नाथ मोतीराम**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मु . सा . काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net